**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक

# आकर्षण

संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २२७ । गुरुवार ४ जून २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## ‘त्यांना’ मुस्लिम सूचक चालतो कसा?; एमआयएम राष्ट्रवादीची बी टीम

### दिवसा हिंदुत्व, रात्री हातमिळवणी?; विधान परिषद नाट्यावर किरण काळेंचा घणाघात । राष्ट्रवादी–एमआयएम समीकरणावर काळेंची तोफ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** लोकशाहीत प्रत्येकाला निवडणूक लढण्याचा अधिकार आहे. निवडणुका पारदर्शकच झाल्या पाहिजेत. मात्र विधान परिषद निवडणुकीच्या अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालय रात्री उशिरापर्यंत बेकायदेशीरपणे कसे सुरू राहिले?, असा सवाल ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केला आहे. ‘‘त्यांना‘‘ सोयऱ्यांच्या विधानपरिषद अर्जावर एमआयएम पक्षाचा मुकुंद नगरचा मुस्लिम नगरसेवक सूचक कसा काय चालतो?, असा सवाल त्यांनी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नाव न घेता केला.

काळे यांनी समाज माध्यमांवरून नेटकऱ्यांशी संवाद साधला. हा संवाद मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. राष्ट्रवादीचे बंडखोर उमेदवार दत्तात्रय पानसरे यांच्या अर्जावर एमआयएमचे नगरसेवक शहबाज अहमद सय्यद यांची सूचक म्हणून स्वाक्षरी होती. दुपारी तीन वाजण्यापूर्वी सूचकाने



अर्ज मागे घेतल्यानंतर रात्री उशिरापर्यंत हाय व्होल्टेज राजकीय नाट्य रंगले. यावर टीका करताना काळे म्हणाले, पानसरे यांची बंडखोरी कुणाच्या इशाऱ्यावर होती हे सर्वांनाच ठाऊक आहे. जे स्वतःला कट्टर हिंदू धर्मरक्षक म्हणवतात त्यांनीच मुकुंद नगरच्या आपल्या पूर्वाश्रमीच्या कट्टर कार्यकर्त्याला सोयऱ्यांचे सूचक केले. एका बाजूला एखाद्या समाजाविरोधात टोकाची भूमिका घ्यायची आणि दुसऱ्या बाजूला त्यांच्याशी हातमिळवणी करायची, ही दोन्ही समाजाशी अनैतिक वर्तणूक आहे.

काळे पुढे म्हणाले, सर्वसामान्य नागरिक कार्यालयीन वेळ संपल्यानंतर एक–दोन मिनिटे उशिरा गेला तरी त्याला प्रवेश मिळत नाही. मतदानाची वेळ संपल्यानंतर मतदाराला बूथवर उभे केले

■ पान ४ वर

**एमआयएम ही ‘बी’टीम**

अहिल्यानगर शहरातील एमआयएम ही राष्ट्रवादीचीच बी टीम असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले असल्याचा आरोप काळे यांनी केला आहे. काळे म्हणाले, मुस्लिम समाजाच्या मतांवर निवडून येऊन जातीयवादी राष्ट्रवादीचा सूचक बनत जातीयवादी शक्तींना मदत करणाऱ्या प्रवृत्तींना मुस्लिम समाजाने खड्यासारखे बाजूला केले पाहिजे. हिंदुत्ववादी तरुणांनीही राजकीय नेत्यांच्या दुटप्पी भूमिकांचे आत्मपरीक्षण केले पाहिजे. भविष्यातील निवडणुका जिंकण्यासाठी एमआयएमच्या आडून धर्मनिरपेक्ष मतांमध्ये फूट पाडण्याचे आणि धार्मिक ध्रुवीकरणाचे राजकारण सुरू आहे. अहिल्यानगरकरांनी हा धोका वेळीच ओळखावा. निवडणुका विकासाच्या मुद्द्यांवर व्हाव्यात. रस्ते, पाणी, वीज, महिला सुरक्षा, युवकांसाठी रोजगार, उद्योग–व्यापार यासाठी सत्तेचा वापर व्हावा; राजकीय पोळ्या भाजण्यासाठी नव्हे, असा टोला काळे यांनी लगावला.

## चारचाकी चोरी झाल्याचे भासवून विमा क्लेम लाटण्याचा कट उघड

### एलसीबीच्या कारवाईत तीन आरोपींना अटक



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्वतःच्या मालकीची स्कॉर्पिओ चारचाकी जीप चोरीला गेल्याची खोटी तक्रार देऊन इन्शुरन्स कंपनीकडून विम्याची रक्कम लाटण्याचा फिर्यादीचा कट स्थानिक गुन्हे शाखेने उघडकीस आणला आहे. याप्रकरणी फिर्यादीसह त्याच्या दोन साथीदारांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून १० लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

फिर्यादी अर्शद आयुब शेख (रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर) याने त्याची स्कॉर्पिओ चोरीला गेल्याची तक्रार तोफखाना पोलीस ठाण्यात दिली होती. त्यावरून भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखालील पथक तपास करत असताना, गोपनीय माहिती मिळाल्यावरून संशयित आरोपी मैनुद्दीन शकील पठाण (वय २१, रा. श्रीरामपूर) याला याच्याबाबत खात्रीशीर माहिती मिळाली. पोलिसांनी तात्काळ श्रीरामपूर परिसरातून ताब्यात घेतले. फिर्यादी अर्शद आयुब शेख याच्या सांगण्यावरून, मैनुद्दीनने त्याचा

■ पान ४ वर

**पथकात यांचा सहभाग**

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी, उपनिरीक्षक अनंत सालगुडे, पोलीस अंमलदार शाहिद शेख, सुनील पवार, फुरकान शेख, अरविंद भिंगारदिवे, योगेश भिंगारदिवे, गणेश धोत्रे आणि प्रशांत राठोड यांच्या पथकाने केली.

## पोलीस अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या जिल्हांतर्गत बदल्या

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्ह्यातील ८ पोलीस उपनिरीक्षक, १४ सहायक पोलीस उपनिरीक्षक (सफौ) व २८४ कर्मचारी अशा एकूण ३०६ पोलिसांच्या जिल्हांतर्गत बदल्या झाल्या असून, याबाबतचे आदेश गुरूवारी (४ जून) काढण्यात आले.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्हांतर्गत बदल्यांचा आदेश जारी केला. यात पोलीस शिपाई ते श्रेणी पोलीस उपनिरीक्षक आणि चालक पोलीस शिपाई ते चालक श्रेणी पोलीस उपनिरीक्षक यांच्या जिल्ह्यांतर्गत बदल्यांचा निर्णय घेण्यात आला आहे. जनहित, कायदा व सुव्यवस्था, प्रशासकीय निकड आणि कर्मचाऱ्यांच्या विनंतीचा विचार करून या बदल्या करण्यात आल्या आहेत.



**एलसीबी अद्याप फेरबदल नाही**

या आठवड्यात जिल्ह्यातील पोलीस अधिका–यांच्या बदल्या झाल्या. त्यात काही पोलीस अधिकारी जिल्ह्याबाहेर गेले, तर काहीजण जिल्ह्यात बदलून आले आहेत. त्यानंतर आता जिल्हांतर्गत बदल्यांचे आदेश निघाले. परंतु स्थानिक गुन्हे शाखेत मात्र अद्याप कोणताही फेरबदल करण्यात आलेला नाही.

## जिल्ह्यात भाजपची सह महायुतीची ताकद पुन्हा अधोरेखित

### सुजय संग्राम जय वीरूच्या जोडीने केली कमाल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विधानपरिषद निवडणुक जागा बिनविरोध करून दाखवत भारतीय जनता पक्षा सह महायुतीने राजकीय पातळीवर महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. अपेक्षेप्रमाणे भाजपचे उमेदवार प्राजक्त तनपुरे हे बिनविरोध निवडून आले असून, या घडामोडीमुळे जिल्ह्यात भाजपची संघटनात्मक ताकद आणि राजकीय प्रभाव पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

महाविकास आघाडीकडून ही जागा काँग्रेसच्या वाट्याला गेल्याचे सुरुवातीला सांगितले जात होते. मात्र काँग्रेसकडून कोणत्याही अधिकृत उमेदवाराने अर्ज दाखल केला नाही. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) कडून राणी लंके यांचे नाव चर्चेत आले होते. त्या अर्ज दाखल करतील, अशी चर्चा होती. मात्र अखेर महाविकास



आघाडीकडून एकाही उमेदवाराने अर्ज भरला नाही.

अर्ज मागे घेण्याच्या अंतिम टप्प्यापर्यंत भाजपचे प्राजक्त तनपुरे, श्रीरामपूरचे नगराध्यक्ष करण ससाणे, श्रीगोंद्याचे राष्ट्रवादीचे कार्यकर्ते दत्तात्रय पानसरे, तसेच कमलेश गांधी आणि मच्छिंद्र धुमाळ यांचे अर्ज शिल्लक होते. गुरुवारी दुपारपर्यंत मच्छिंद्र धुमाळ आणि कमलेश गांधी यांनी आपले अर्ज मागे घेतले.

दरम्यान, काही काळासाठी करण ससाणे हे संपर्काबाहेर गेल्याने राजकीय वर्तुळात उत्सुकता निर्माण झाली होती. मात्र त्यांनीही अचानक समोर येत आपला अर्ज मागे घेतला. त्यानंतर प्राजक्त तनपुरे यांच्या विरोधातील एकमेव अर्जदार राहिलेले दत्तात्रय पानसरे यांची मनधरणी करण्यात महायुतीला यश आले. अर्ज मागे घेण्याच्या मुदतीच्या अखेरच्या काही मिनिटांत त्यांनीही माघार घेतल्याने प्राजक्त तनपुरे यांची बिनविरोध निवड निश्चित झाली. विशेष म्हणजे, नुकतेच भाजपमध्ये प्रवेश केलेले प्राजक्त तनपुरे हे आता अहिल्यानगर जिल्ह्यातील १८ वे आमदार ठरले आहेत.

संग्राम – सुजय जय वीरूच्या जोडीने केली कमाल

विशेष म्हणजे या संपूर्ण राजकीय घडामोडीत डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांच्या समन्वयाचीही मोठी

■ पान ४ वर

## ऊसतोड मजुरांची प्रामाणिक सेवा करणे हीच मुंडे साहेबांना खरी आठवण आणि श्रद्धांजली ठरेल – डॉ. ज्ञानेश्वर दराडे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार–** लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या स्मृतीदिनानिमित्त देवनाथ फाउंडेशनच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबवून त्यांना अभिवादन करण्यात आले. ‘मुंडे साहेबांनी आयुष्यभर वंचित, कष्टकरी आणि ऊसतोड मजुरांच्या हक्कासाठी संघर्ष केला. त्यामुळे ऊसतोड मजुरांची प्रामाणिक सेवा करणे हीच मुंडे साहेबांना खरी आठवण आणि श्रद्धांजली ठरेल,’ असे प्रतिपादन देवनाथ फाउंडेशनचे प्रमुख डॉ. ज्ञानेश्वर दराडे यांनी केले.अभिवादन आणि सामाजिक उपक्रमगोपीनाथ मुंडे यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून देवनाथ फाउंडेशनच्या वतीने परिसरात विविध सेवाभावी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. केवळ औपचारिक कार्यक्रम न करता थेट तळागाळातील घटकांपर्यंत मदत पोहोचवण्यावर यंदा भर देण्यात आला.डॉ. ज्ञानेश्वर दराडे यांचे विचारयाप्रसंगी बोलताना डॉ. दराडे म्हणाले की, गोपीनाथ मुंडे साहेब हे बहुजनांचे आणि

■ पान ४ वर

## देर्डे फाटा येथील साई जनार्दन हॉटेल तोडफोड प्रकरण; तीन दिवस उलटूनही गुन्हा दाखल नसल्याने चर्चांना उधाण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**कोपरगाव–** कोपरगाव तालुक्यातील देर्डे फाटा येथे असलेल्या साई जनार्दन हॉटेलमध्ये दोन दिवसांपूर्वी घडलेल्या मारहाण आणि तोडफोडीच्या घटनेची परिसरात मोठी चर्चा सुरू आहे. या घटनेत हॉटेल मालकाला मारहाण करण्यात आल्याचे तसेच हॉटेलची मोठ्या प्रमाणात तोडफोड करण्यात आल्याचे समोर आले आहे. गंभीर दुखापत झाल्याने संबंधित मालकावर रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती मिळत आहे.या प्रकरणामागे आदिवासी समाजातील एका महिलेबाबत गैरवर्तन केल्याचा आरोप करण्यात आल्याची चर्चा विविध स्तरांवर सुरू आहे. मात्र, या आरोपांबाबत अधिकृतरीत्या कोणतीही पुष्टी झालेली नसून पोलीस प्रशासनाकडून यासंदर्भात अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही.

दरम्यान, या घटनेत हॉटेलचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचे सांगितले




जात आहे. हॉटेलमधील साहित्याची तोडफोड, नुकसानग्रस्त परिसर याचे विडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. त्यामुळे या घटनेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

विशेष म्हणजे, एवढी गंभीर घटना घडून दोन दिवसांचा कालावधी उलटून गेला असतानाही तालुका पोलीस ठाण्यात अद्याप कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल झाल्याची नोंद उपलब्ध नसल्याचे समोर येत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये विविध तर्क–वितर्कांना उधाण आले असून नेमके या प्रकरणात

■ पान ४ वर

# दै. आकर्षण निवडक

## शिक्षकांच्या आरोग्य सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर



अहिल्यानगर - राज्यातील हजारो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आरोग्य सुरक्षेशी संबंधित गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, जिल्हा परिषद तसेच १०० टक्के अनुदानित खासगी शाळांमधील कर्मचाऱ्यांना पूर्वीप्रमाणे वैद्यकीय बिल परतावा योजना कायम ठेवावी किंवा पर्यायाने संपूर्णपणे प्रभावी कॅशलेस वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी भाजप शिक्षक सेलच्या वतीने जिल्हाध्यक्ष वैभव सांगळे यांनी केली आहे. या संदर्भात शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याची माहिती सांगळे यांनी दिली. सध्या केंद्र सरकारच्या आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना 'आभा () कार्ड' काढण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शिक्षण संचालनालयाच्या निर्देशानुसार राज्यातील १०० टक्के अनुदानित खासगी शाळांतील शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी ही प्रक्रिया पूर्ण करण्यास सुरुवात केली आहे. शासनाचा हा निर्णय सकारात्मक आणि स्वागतार्ह असला, तरी प्रत्यक्षात अनेक खासगी रुग्णालयांमध्ये आभा कार्डधारकांना अपेक्षित कॅशलेस उपचार सुविधा मिळत नसल्याचे वास्तव समोर येत आहे.यामुळे गंभीर आजार, अपघात किंवा आकस्मिक वैद्यकीय उपचारांच्या वेळी शिक्षकांना मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. अनेक शिक्षकांना स्वतःच्या खिशातून लाखो रुपयांचा खर्च करावा लागत असून, शासनाच्या योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळत नसल्याने शिक्षकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. वैभव सांगळे यांनी सांगितले की, आभा कार्ड आणि विविध आरोग्य योजनांचा उद्देश चांगला असला तरी प्रत्यक्ष लाभार्थ्यांना त्याचा फायदा मिळणे अधिक महत्त्वाचे आहे. अनेक रुग्णालयांकडून कॅशलेस सुविधा नाकारली जात असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. त्यामुळे शिक्षक व कर्मचाऱ्यांसाठी ही योजना केवळ कागदोपत्री राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या महिला जिल्हाध्यक्षपदी लतिका पवार यांची फेरनियुक्ती

अहिल्यानगर - पर्यावरण संरक्षण, वृक्षसंवर्धन



आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या लतिका नंदकुमार पवार यांची निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ (महाराष्ट्र राज्य) यांच्या महिला जिल्हाध्यक्षपदी फेरनियुक्ती करण्यात आली आहे.

संस्थेचे राज्याध्यक्ष प्रमोद मोरे यांनी त्यांच्या पर्यावरण विषयक जनजागृती, वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन क्षेत्रातील सातत्यपूर्ण योगदानाची दखल घेत ही नियुक्ती जाहीर केली. सन २०२३ ते २०२५ या कालावधीत त्यांनी केलेल्या प्रभावी कार्याचा गौरव म्हणून त्यांच्यावर पुन्हा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. त्यांचा नवीन कार्यकाळ २०२६ ते २०२९ या तीन वर्षांसाठी असणार असून, या काळात पर्यावरण संवर्धनासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम, जनजागृती मोहिमा आणि सामाजिक सहभाग वाढविणाऱ्या योजना राबविण्याचा त्यांचा मानस आहे. लतिका पवार यांनी पर्यावरण संरक्षणासाठी केवळ वृक्षारोपण करून चालणार नाही, तर लावलेली झाडे जगविणे आणि त्यांचे संवर्धन करणे अधिक महत्त्वाचे असल्याचे सांगितले. आगामी काळात शालेय विद्यार्थी, महिला बचत गट, सामाजिक संस्था आणि नागरिकांच्या सहभागातून व्यापक वृक्षसंवर्धन मोहीम उभारली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# फुल दिले की फुलच मिळते, दगड दिले की दगडच मिळते, त्यामुळे कुणी टीका केली तर शांत राहायचं. कुणाचे पाय कापून तर आपण उंच होणार नाही - जॅकी श्रॉफ

## जॅकी दादाच्या उपस्थितीने विट्याची ट्री आर्मी जागतिक नकाशावर– आमदार सुहास बाबर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी






**अहिल्यानगर–** खानापूर आटपाडीचे आमदार सुहास बाबर म्हणजे पिंपळाच्या झाडासारखा सळसळता उत्साह आहे. त्याला वाढविण्याची, जपण्याची आणि पाणी घालण्याची जबाबदारी तुमची–आमची आहे,'' अशा हृदयस्पर्शी शब्दांत ज्येष्ठ अभिनेते जॅकी श्रॉफ यांनी शिवसेनेचे आमदार सुहास बाबर यांच्या कार्याचे कौतुक करत ट्री आर्मीच्या वृक्षलागवड चळवळीला भक्कम पाठिंबा दिला. गार्डी–घानवडच्या माळावर ट्री आर्मी आणि जेके फाउंडेशनच्या माध्यमातून साडेचार हजार वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी जॅकी श्रॉफ यांच्या हस्ते या लोकचळवळीचा औपचारिक शुभारंभ झाला.

कार्यक्रमात बोलताना जॅकी श्रॉफ यांनी आमदार बाबर यांच्या साधेपणा, कार्यतत्परता आणि पर्यावरणावरील प्रेमाचे विशेष कौतुक केले. ''फक्त बोलणारे आणि प्रत्यक्ष काम करणारे यांच्यात फरक असतो. सुहास बाबर हे बोलण्याइतकेच कृतीतही प्रामाणिक आहेत,'' असे सांगत त्यांनी वृक्षलागवडीच्या माध्यमातून समाजाला दिशा देणाऱ्या या उपक्रमाचे अभिनंदन केले. पृथ्वी ही आपली आई असून तिचे संवर्धन करण्यासाठी प्रत्येकाने झाडे लावली पाहिजेत, असा संदेशही त्यांनी दिला.

आमदार सुहास बाबर यांनी ट्री आर्मी ही कोणत्याही पक्षाची नव्हे तर समाजाची चळवळ असल्याचे सांगितले. विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या मताधिक्याइतकी झाडे लावण्याचा संकल्प केला असून पुढील दोन वर्षांत ७८ हजार वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जॅकी श्रॉफ यांच्या सहभागामुळे या मोहिमेला राष्ट्रीय ओळख मिळणार असून विट्यातून सुरू झालेली ट्री आर्मी आता देशभर आणि जगभर पोहोचेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाला मुंबईहून जॅकी श्रॉफ यांचे मित्र, ड्रीम वर्थ सोल्युशन या कंपनीचे संचालक उपस्थित होते. तसेच खानापूर पंचायत समितीच्या सभापती सुवर्णा भोसले, नगराध्यक्षा काजल म्हेत्रे, उपनगराध्यक्ष अमोल बाबर, प्रांताधिकारी डॉ. विक्रम बांदल, तहसीलदार योगेश्वर टोम्पे, उपविभागीय पोलीस अधिकारी विपुल पाटील, गटविकास अधिकारी डॉ. संताजी पाटील, पोलीस निरीक्षक धनंजय फडतरे, उपसभापती सुहास शिंदे यांची ,माजी नगरसेवक अमर शितोळे, नविन यात्रा कमिटीचे अध्यक्ष रणजित पाटील, खरेदी विक्री संघाचे चेअरमन हेमंत बाबर, प्रकाश बागल, नगरसेवक रामचंद्र भिंगारदेवे, भालचंद्र कांबळे, रोहित पाटील, अँड. रोहित पवार, श्रीधर जाधव, सरपंच संग्राम नलवडे, सौरभ रोकडे, विशाल पाटील, दिलीप किर्दत, सुजय गोसावी यांच्यासह ट्री आर्मीचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक फिरोज शेख यांनी केले. सूत्रसंचालन धीरज भिंगारदेवे यांनी केले. आभार राहुल साळुंखे यांनी मानले.

### आमदार आले जमिनीवर

**आमदार बाबर म्हणाले, मला मी खुप जमिनीवर राहुन काम करतो असे वाटायचे परंतु जॅकी दादांच्याकडे पाहिल्यावर माझा हा भ्रम फुटला आहे. एक सेलिब्रिटी असुन देखिल किती विनम्र आणि किती साधे असावे हे पाहून आवाक झालो आहे. पत्नी सोनिया बाबर यांनी जॅकी श्रॉफ यांचे औक्षण करून पुष्पवृष्टी करून स्वागत केले. त्यानंतर बाजरीची भाकरी, तूप, गूळ आणि मीठ असा साधा नाष्टा त्यांनी केला. एवढा साधा माणूस मी माझ्या आयुष्यात पाहिला नसल्याचे गौरवोद्गार आमदार बाबर यांनी काढले.**

# समाजसेवा आणि अध्यात्म यांचा संगम घडविणाऱ्या उपक्रमांना सर्वांनी पाठबळ द्यावे - आमदार संग्राम जगताप

## अधिक मासानिमित्त नऊकुंडी श्री विष्णू याग, कीर्तन सोहळा व नेत्रचिकित्सा शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** प.पू. श्री अमळनेरकर महाराज सेवा समितीच्या वतीने अधिक मासानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या नऊकुंडी श्री विष्णू याग, कीर्तन सोहळा आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचा शुभारंभ बंधन लॉन्स येथे भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. ह.भ.प. प्रसाद महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यास भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अध्यात्म, संस्कार आणि समाजसेवा यांचा सुंदर संगम घडवून आणणाऱ्या या उपक्रमामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून पहिल्याच दिवशी मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घेतला.

याच निमित्ताने नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. प्रफुल्ल चौधरी यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्रचिकित्सा शिबिराचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी उपमहापौर धनंजय जाधव, डॉ. प्रफुल्ल चौधरीनगरसेवक महेश लोंढे , सेवा समितीचे पदाधिकारी, विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटनानंतर मान्यवरांनी शिबिराची पाहणी करून रुग्णांशी संवाद साधला व आयोजकांच्या कार्याचे कौतुक केले.

या नेत्रचिकित्सा शिबिरात सुमारे दोनशेहून अधिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत नेत्रतपासणी करून घेतली. ग्रामीण व शहरी भागातील अनेक ज्येष्ठ नागरिक, महिला आणि युवकांनी या शिबिराचा लाभ घेतला. तपासणीदरम्यान आवश्यक रुग्णांना पुढील उपचारांसाठी मार्गदर्शन करण्यात आले. आरोग्यसेवेचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश ठेवून आयोजित केलेल्या या शिबिराचे उपस्थितांनी स्वागत केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी वैदिक मंत्रोच्चारांच्या वातावरणात नऊकुंडी श्री विष्णू यागाला प्रारंभ करण्यात आला. यागस्थळी भाविकांनी मोठ्या श्रद्धेने उपस्थित राहून धार्मिक विधींमध्ये सहभाग घेतला. अधिक मास हा अध्यात्म, साधना आणि दानधर्मासाठी महत्त्वाचा मानला जात असल्याने या काळात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. संपूर्ण परिसरात भक्तिमय आणि मंगलमय वातावरण अनुभवायला मिळाले

पहिल्या दिवशी ह.भ.प. प्रसाद महाराज यांची तुला आणि वायनदानाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या वेळी भाविकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग घेतला. धार्मिक परंपरा जपत समाजहिताचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमामुळे उपस्थितांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. तुला सोहळ्यादरम्यान भक्तांनी जयघोष करीत संतांविषयीची श्रद्धा व्यक्त केली

त्यानंतर ह.भ.प. श्री महेश जोशी महाराज यांच्या प्रवचनाने उपस्थितांना आध्यात्मिक मार्गदर्शन मिळाले. त्यांनी अधिक मासाचे धार्मिक महत्त्व, संत साहित्याची परंपरा, नामस्मरणाचे महात्म्य आणि समाजजीवनात संस्कारांचे स्थान यावर सखोल विवेचन केले. त्यांच्या ओजस्वी आणि अभ्यासपूर्ण निरूपणामुळे उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. प्रवचनातून नैतिक मूल्ये जपण्याचा आणि समाजात सकारात्मक विचार रुजविण्याचा संदेश देण्यात आला.

यावेळी देवगड संस्थानचे महंत श्री प्रकाश नंदगिरीजी महाराज यांच्या हस्ते संतपूजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. संत परंपरेचे स्मरण करून समाजात सद्भावना, सेवा आणि अध्यात्मिक विचारांचा प्रसार व्हावा, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. संतांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी समाजाची असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमात विविध संत–महंत आणि धर्मप्रेमी नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान सामूहिक हरिपाठाचे आयोजन करण्यात आले. शेकडो भाविकांनी एकत्र येऊन हरिनामाचा गजर करत भक्तीमय वातावरण निर्माण केले. हरिपाठामुळे परिसरातील वातावरण प्रसन्न झाले असून उपस्थितांना आध्यात्मिक समाधानाची अनुभूती मिळाली. हरिनामाच्या गजराने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. यानंतर रात्री ह.भ.प. श्री ऋषिकेश महाराज खोसे यांच्या कीर्तनाने उपस्थित भाविकांना भक्तिरसाचा आनंद दिला.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप यांनी धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांची आजच्या काळातील गरज अधोरेखित केली. ते म्हणाले की, समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अध्यात्म आणि समाजसेवा या दोन्ही गोष्टी आवश्यक आहेत. धार्मिक कार्यक्रमातून संस्कारांची जपणूक होते, तर आरोग्यविषयक शिबिरांमुळे सर्वसामान्य नागरिकांना प्रत्यक्ष लाभ मिळतो. प.पू. श्री अमळनेरकर महाराज

# शिवाबाबा वाघ साहित्यिक प्रतिष्ठानकडून कथालेखक बाळासाहेब देशमुख सन्मानित

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** शिवाबाबा वाघ साहित्यिक प्रतिष्ठान पिंपळगाव जलाल ( येवला) आयोजित शहादू शिवाजी वाघ पाचवा स्मृती राज्यस्तरीय साहित्य कलाकृती पुरस्कार प्रदान सोहळा, जलालपुर तालुका येवला, येथे ०४ जून २०२६ रोजी पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक नंदकुमार राऊत हे होते. तर कार्यक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक दादासाहेब कोते यांनी केले. प्रमुख पाहुणे माजी आमदार स्नेहलता कोल्हे मॅडम, ज्येष्ठ साहित्यिक सुभाष सोनवणे, गझलकार रज्जाक शेख, कवयित्री स्वाती ठुबे, शशिकांत शिंदे हे होते. या सोहळ्यासाठी महाराष्ट्राच्या विविध भागातून साहित्यिक आले होते. कथा, कादंबरी, कविता, ललित प्रकारातील सर्वोत्कृष्ट कलाकृतींना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

सदर सोहळ्यामध्ये अहिल्यानगरचे कथालेखक बाळासाहेब देशमुख यांना, साहित्य लेखन,साहित्यिक योगदानाबद्दल , कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक नंदकुमार राऊत, प्रमुख अतिथी ज्येष्ठ साहित्यिक सुभाष सोनवणे, यांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी जेष्ठ कवी आनंदा साळवे, विनय पिपरकर ,शर्मिला गोसावी , साहित्यिक प्रशांत वाघ हे मान्यवर उपस्थित होते. बाळासाहेब देशमुख यांचे रंग माझा वेगळा ,माणसे अशी.. अन् तशीही.., माणसे भिंगातून.., इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. ज्येष्ठ साहित्यिक सदानंद भणगे , इतिहास अभ्यासक नवनाथ वाव्हळ यांनी , देशमुखांचे अभिनंदन केले आहे.

# शिव–पाणंद शेतरस्त्यांच्या प्रलंबित प्रकरणांवर मंत्रालयात पुरावे सादर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** राज्यातील लाखो शेतकऱ्यांच्या हक्काच्या शेतरस्त्यांचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिव–पाणंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे २३ कलमी मागण्यांचे सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. यावेळी राज्यभरातील शेकडो प्रलंबित शेतरस्ता प्रकरणांचे पुरावे मंत्रालयात सादर करून ''मिशन झिरो पेंडन्सी'' अभियान राबविण्याची जोरदार मागणी करण्यात आली.

शेतरस्ता हा शेतकऱ्यांचा मूलभूत हक्क असून शेती उत्पादन, सिंचन व्यवस्था, कृषी यंत्रसामुग्रीची ने–आण तसेच शेतीमाल बाजारपेठेत पोहोचविण्यासाठी अतिक्रमणमुक्त आणि दर्जेदार रस्ते अत्यावश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शासनाने शेतरस्ते अडविणाऱ्यांविरोधात कठोर धोरण स्वीकारले असले तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीत अनेक अडचणी येत असल्याने हजारो प्रकरणे अद्याप प्रलंबित असल्याचे चळवळीच्या पदाधिकाऱ्यांनी निदर्शनास आणून दिले.

निवेदनामध्ये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम ५(२) व १४३ मध्ये सुधारणा, शेतरस्ते खुले करण्यासाठी विनाशुल्क पोलिस बंदोबस्त, प्रलंबित प्रकरणांचा कालबद्ध निपटारा, मोजणी व अतिक्रमण निर्मूलनासाठी स्वतंत्र निधी, शासकीय यंत्रसामुग्रीची उपलब्धता, डिजिटल पुराव्यांचा वापर, पारदर्शक कार्यपद्धती, स्वतंत्र नियंत्रण कक्ष, ग्रामस्तरीय शेतरस्ता समित्या तसेच शिव–पाणंद रस्त्यांसाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्यासह विविध महत्त्वपूर्ण मागण्या करण्यात आल्या आहेत.

# तक्रारीचा राग मनात धरून गवळी कुटुंबावर जीवघेणा सशस्त्र हल्ला

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** किरकोळ भांडणाच्या प्रकरणात बेलवंडी पोलीस ठाण्यात तक्रार दिल्याचा राग मनात धरून एका कुटुंबावर तलवार, कुऱ्हाड व दांडक्यांनी सशस्त्र हल्ला केल्याची धक्कादायक घटना श्रीगोंदा तालुक्यातील कोळगाव परिसरात घडल्याची माहिती समोर आली आहे. या हल्ल्यात गवळी कुटुंबातील अनेक जण जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा शासकीय रुग्णालय, अहिल्यानगर येथे उपचार सुरू आहेत.

याबाबत दिगंबर भाऊ गवळी (वय ३८, रा. वेठेकर वाडी, कोळगाव, ता. श्रीगोंदा) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांच्या शेजारी राहणारे तानाजी बबन लगड यांच्याशी काही दिवसांपूर्वी किरकोळ वाद झाला होता. ३१ मे २०२६ रोजी तानाजी लगड यांनी दारूच्या नशेत शिवीगाळ केल्याने दिगंबर गवळी यांनी बेलवंडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.

फिर्यादीनुसार, त्याच दिवशी सायंकाळी तानाजी लगड यांनी दिगंबर गवळी यांच्या आई–वडिलांना शिवीगाळ करून मारहाण केली होती. त्यानंतर दोन्ही कुटुंबांमध्ये समेट झाल्याचे सांगितले जाते. मात्र, १ जून २०२६ रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास गवळी कुटुंब घरात जेवण करत असताना वैभव तानाजी लगड, तानाजी बबन लगड, बिभीषण बबन लगड, तात्या बबन लगड, त्यांचे नातेवाईक तसेच इतर १० ते १५ अनोळखी व्यक्ती घरात घुसल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

या वेळी आरोपींनी शिवीगाळ करत हल्ला चढविला. वैभव लगड याने तलवारीने दिगंबर गवळी यांच्या डोक्यावर वार केल्याचा, तर तानाजी लगड याने कुऱ्हाडीच्या दांड्याने त्यांच्या चेहऱ्यावर मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### गुलमोहर रोडवरील श्री.स्वामी समर्थ मंदिरातील मोगरा महोत्सवाने भाविक सुखावले

अहिल्यानगर- सावेडी उपनगरातील गुलमोहर रोडवरील श्री.स्वामी समर्थ मंदिरात आदिक मासानिमित्त मोगरा महोत्सव साजरा करण्यात आला. गेल्या तीन



आठवड्यापासून श्री.स्वामी समर्थ मंदिरात आदिक मासामुळे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत होते. नित्य नियमाने रुद्राभिषेक, पोथी वाचन विष्णुयाग संपन्न झाले. शुक्रवारी सकाळी विजय पानमळकर या भाविकांनी मोगरा फुलाच्या सजावटीने श्री स्वामी समर्थ मूर्तीचे सुशोभीकरण केले या सेवेमुळे स्वामी भक्तांनी कौतुक केले. या मोगरा महोत्सवामुळे संपूर्ण मंदिरात मोगऱ्याच्या सुगंधाने वातावरण दरवळले होते स्वामीभक्त सुखावले होते.

### घोगरगावात उपसरपंच डॉ. दिलीप भोस यांचा नागरी सत्कार

अहिल्यानगर- घोगरगाव येथील उपसरपंच डॉ. दिलीप भोस यांच्या अभिष्टचिंतनानिमित्त गावकऱ्यांच्या वतीने भव्य नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. भोस यांच्या सामाजिक, शैक्षणिक व ग्रामविकासातील योगदानाचा गौरव करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सत्कार समारंभात गावातील विविध क्षेत्रांतील नागरिक, पदाधिकारी व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात डॉ. दिलीप भोस यांनी गावकऱ्यांनी दाखविलेल्या प्रेमाबद्दल व विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. याप्रसंगी मिलिंद भोसले, दत्ता नालफुल, शंकर तरटे, रामदास उगले, जालिंदर उल्हारे, धनंजय दाते, संतोष बोरुडे, दिलीप लुनिया, समीर शेख, राजेंद्र तरटे, पठाण साहेब, नवनाथ उगले, सागर भोस, प्रशांत भोस, दिलीप जाधव, आदिल शेख, सुहास बोरुडे, सुधीर तरटे, सतीश उगले, माधव तरटे, दत्तात्रय भोस, अरुण उगले, दिलीप तरटे, बिट्टू टेलर, गोरख शिंदे, शरद तरटे, शिवाजी गुंजाळ, डॉ. बेरड, अश्रू शिंदे, अजिनाथ तरटे, सुनील तरटे, जहीर पठाण, विनायक धामणे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. गावकऱ्यांनी डॉ. दिलीप भोस यांना पुष्पहार, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करत त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला.

### हेमंत रत्नपारखी लिखित मेहेरगाथा चे प्रकाशन



अहिल्यानगर- अवतार मेहेरबाबा नगर केंद्रामध्ये हेमंत रत्नपारखी लिखित मेहेरगाथाचे प्रकाशन नगर सेंटरचे अध्यक्ष डॉ.मेहेरनाथ कलचुरी यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी सुमित रत्नपारखी,अनिकेत रत्नपारखी,विना रत्नपारखी,विद्या माने,प्रकाश माने,मोहन जुंद्रे,श्रीमंत माळी,स्वप्निल महामुनी,एड दारुणकर,राहुल मुळे,श्रुती मुळे,प्रशांत डाडर,नीलिमा औटी,माधुरी मिसाळ,एड निंबाळकर,जेनस जॉईन,झारा मलकी आदींसह मोठ्या संख्येने मेहेरप्रेमी उपस्थित होते मेहेरनाथ कलचुरी यावेळी बोलताना म्हणाले हेमंत रत्नपारखी लिखित मेहेर गाथा हि काव्यात्मक रचना मराठीतील अवतार मेहेरबाबांच्या आध्यात्मिक कार्यावरील प्रथम अशी रचना पाहण्यात आली आणि मनास अतिशय आनंद झाला. ह्या पदय काव्यात्मक रचनेचे कौतुक करावे तितके थोडे आहे.अवतार मेहेरबाबांच्या जीवनातील अनेक प्रसंग, घटना आणि त्यांचे आध्यात्मिक कार्य आपण ओघावत्या शैलीत गुंफण्याचा जो कौतुकास्पद प्रयत्न केलेला आहे तो निश्चितच अभिनंदनीय आहे.हि पदय मेहेर गाथा निश्चितपणे अवतार मेहेरबाबांचे जे काही आध्यात्मिक साहित्य आज उपलब्ध आहे त्यात मोलाची भर टाकेल यात काही शंका नाही. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील तमाम मेहेरप्रेमींना देखील हे अनोखे साहित्य उपलब्ध होत आहे हि भुषणास्पद बाब होय.

# ‘पुस्तकांचे गाव’ उपक्रमाचे प्रभावी नियोजन करा – जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी आणि ग्रामीण भागात ज्ञानाचा प्रसार व्यापक करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या ‘पुस्तकांचे गाव’ या महत्त्वाकांक्षी योजनेची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून उपक्रमाचे सुसूत्र नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात ‘पुस्तकांचे गाव–विस्तार’ योजनेअंतर्गत जिल्ह्यात ‘पुस्तकांचे गाव’ उभारण्याबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.

यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके, तहसीलदार नागेश गायकवाड, जिल्हा ग्रंथालय निरीक्षक रामदास शिंदे, मराठी भाषा समिती सदस्य किशोर मरकड, संजय कळमकर, शशिकांत नजन तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले की, वाचन संस्कृती ही समाजाच्या बौद्धिक विकासाचा पाया आहे. ग्रामीण भागातील नागरिक, विद्यार्थी आणि युवकांना दर्जेदार साहित्य सहज उपलब्ध व्हावे, यासाठी ‘पुस्तकांचे गाव’ ही संकल्पना अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ज्ञान, साहित्य आणि संस्कृतीचा प्रसार अधिक प्रभावीपणे होण्यास मदत होईल.

पुस्तकांचे गाव उभारताना स्थानिक वैशिष्ट्ये, उपलब्ध जागा, वाचन संस्कृतीची परंपरा तसेच पर्यटनविकासाची क्षमता यांचा विचार करावा. हा उपक्रम केवळ पुस्तक विक्री किंवा प्रदर्शनापुरता मर्यादित न ठेवता वाचन प्रेरणा उपक्रम, साहित्यिक कार्यक्रम, ग्रंथदालन, अभ्यासिका आणि सांस्कृतिक उपक्रमांचा समावेश असलेले ज्ञानकेंद्र विकसित करण्यावर भर द्यावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. बैठकीत ‘पुस्तकांचे गाव–विस्तार’ योजनेच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्ह्यातील संभाव्य ठिकाणे, उपलब्ध सुविधा, आवश्यक पायाभूत व्यवस्था तसेच उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी करण्यात येणाऱ्या नियोजनाचा आढावा घेण्यात आला.

पर्यावरण दिनानिमित्त हरियालीचा उपक्रम

## भुईकोट किल्ल्यावर वटवृक्षाची केली लागवड



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** हरियाली संस्थेच्या वतीने अहिल्यानगर येथील ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याच्या बाहेरील बाजूस वड, उंबर, पिंपळ या देशी आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या व सदैव ऑक्सिजन देणाऱ्या वृक्षांची लागवड करून जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

वाढते तापमान आणि प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी तसेच भरपूर प्रमाणात ऑक्सिजन निर्मिती व्हावी या दृष्टीने यावर्षी हरियाली संस्थेच्या वतीने व्यापक स्वरूपात वृक्ष लागवड करुन संवर्धन करण्यात येणार असून यामध्ये प्रामुख्याने देशी वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे.

या उपक्रमाचा शुभारंभ आज शहरातील नागरिकांच्या शुभहस्ते जागतिक पर्यावरण दिनानिमित्त अहिल्यानगर येथील ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याच्या परिसरात वड, उंबर, पिंपळ यांच्या रोपांची लागवड करून करण्यात आला.

यावेळी हरीयाली संस्थेचे अध्यक्ष सुरेश खामकर, एलसीबीचे गणेश लबडे, अजित आरू, जालिंदर बोरुडे, महेश गोंढाळ, संदीप शिंगवी, सागर काबरा, ठाकूरदास परदेशी, तुळशीराम पालीवाल, मनीष कुटे आदी नागरिकांनी वृक्ष लागवड मोहिमेत सहभाग घेतला.

## समस्त आंबेडकरी समाज बैठकीस उपस्थित राहण्याचे आवाहन– सुरेश बनसोडे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी






**अहिल्यानगर–** अनुसूचित जातीतील अन्यायकारक उपवर्गीकरण रद्द करण्याच्या प्रमुख मागणीसाठी बीड ते मंत्रालय, मुंबई दरम्यान आयोजित करण्यात येणाऱ्या लाँग मार्चच्या यशस्वी नियोजनासाठी रविवार दि. ७ जून २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता तारकपूर बसस्थानक शेजारील हॉटेल व्ही स्टार येथे कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे.या बैठकीस लाँग मार्चचे प्रमुख संयोजक सिद्धार्थजी शिनगारे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून, जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील प्रमुख कार्यकर्ते, विहार समितीचे सदस्य, सामाजिक, धार्मिक व राजकीय संघटनांचे पदाधिकारी तसेच भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविणारे सुरेश बनसोडे यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील समस्त आंबेडकरी समाजबांधव, कार्यकर्ते व भीमसैनिकांनी या महत्त्वपूर्ण बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहून उपवर्गीकरणाविरोधातील लढ्यास बळ द्यावे, असे आवाहन केले आहे. तसेच आगामी लाँग मार्चच्या नियोजनाबाबत महत्त्वपूर्ण चर्चा होणार असल्याने सर्वांनी वेळेत उपस्थित राहून आपल्या सूचना व मते मांडावीत, असेही त्यांनी नमूद केले.

## कर्जमाफी योजनेच्या शासन निर्णयाची पैठणमध्ये होळी



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** राज्य शासनाने जाहीर केलेल्या ‘‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६‘‘ विरोधात पैठण येथे सर्वसामाजिक संघटनेच्या वतीने गुरुवारी आंदोलन करण्यात आले. यावेळी शासन निर्णयाची प्रतीकात्मक होळी करून निषेध नोंदविण्यात आला.

शासनाने जाहीर केलेली कर्जमाफी योजना शेतकऱ्यांची दिशाभूल करणारी असून विविध अटी व निकषांमुळे अनेक पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. सर्व पात्र शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्यात यावी तसेच योजनेतील अन्यायकारक अटी तातडीने रद्द कराव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

आंदोलनादरम्यान शासनाच्या धोरणांविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. शेतकऱ्यांना न्याय मिळाला नाही तर राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. या आंदोलनात अनिल राऊत, किशोर सदावर्ते, साईनाथ कर्डिले, पवन सिसोदे, सुभाष नवथर, रामेश्वर बावणे, विशाल काळे, ज्ञानेश्वर उगले, शिवाजी साबळे, कृष्णा काळे, विष्णू बर्डे, शिवाजी साटोले, कैलास मोरे, संभाजी डांगे, एकनाथ मिसाळ, अशोक ठोंबरे यांच्यासह शेतकरी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## अवतार मेहेर बाबा ट्रस्टशी लाल बावटा युनियनचे पगारवाढीचा करार

### तीन वर्षांसाठी कामगारांना मिळणार ४,८०० पगारवाढ



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** लाल बावटा जनरल कामगार युनियन संलग्न अवतार मेहेर बाबा कामगार युनियन आणि अवतार मेहेर बाबा ट्रस्ट यांच्यातील नवीन वेतनवाढ करार बुधवारी (दि. ४ जून) सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयात पार पडला. सहाय्यक कामगार आयुक्त रे. मु. भोसले यांच्या उपस्थितीत युनियनचे पदाधिकारी आणि ट्रस्टच्या विश्वस्तांनी करारावर स्वाक्षऱ्या करून पुढील तीन वर्षांसाठी कामगारांच्या वेतन व विविध सुविधांबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला.

सन २०२३ ते २०२६ या कालावधीतील विद्यमान करार मार्च २०२६ मध्ये संपुष्टात आल्यानंतर नवीन करारासाठी कामगार संघटना आणि ट्रस्ट यांच्यात अनेक फेऱ्यांच्या बैठका झाल्या. दोन्ही बाजूंनी सकारात्मक भूमिका घेतल्याने कोणताही औद्योगिक वाद निर्माण न होता तडजोडीने हा करार करण्यात आला. यासाठी सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयात डिमांड नोटीस सादर करण्यात आली होती.

नवीन करारानुसार सन २०२६ ते २०२९ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी कामगारांना एकूण ४,८०० इतकी वेतनवाढ देण्यात येणार आहे. ही वाढ टप्प्याटप्प्याने लागू केली जाणार असून दरवर्षी १,६०० प्रमाणे वेतनवाढ मिळणार आहे. याशिवाय दिवाळी बोनस व भेट रक्कम मिळून पूर्वीपेक्षा १,५०० ची वाढ करण्यात आली असून आता कामगारांना ९,५०० इतका बोनस मिळणार आहे. कामगारांच्या कुटुंबीयांच्या शैक्षणिक गरजांचाही विचार करण्यात आला असून कर्मचाऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी पात्रतेनुसार १२ हजारांपर्यंत शैक्षणिक सहाय्य उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच पूर्वी मिळणारे इतर सर्व लाभ नियमांनुसार कायम राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

नवीन करारावर स्टच्या वतीने विश्वस्त रमेश जंगले व युनियनच्या वतीने लाल बावटाचे जिल्हा सचिव कॉ. ॲड. सुधीर टोकेकर, कॉ. ॲड. सुभाष लांडे, युनिट अध्यक्ष सतीश पवार यांनी स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी व्यवस्थापन लेबर ऑफिसर श्रीनिवास वंगार यांच्यासह उपाध्यक्ष संजय कांबळे, सचिव विजय भोसले, सुभाष शिंदे, प्रविण भिंगारदिवे, सुनिता जावळे, सुनिल दळवी, राधाकिसन कांबळे, चंद्रकला देशमुख, श्रीनाथ पाटोळे, रामदास कल्हापूरे, गणेश गहिले, राजेंद्र मोरे, दिगंबर माने आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना युनियनचे नेते कॉ. ॲड. सुधीर टोकेकर म्हणाले की, ट्रस्टसोबत संघटनेचा हा चौथा करार असून कामगारांच्या हक्कांसाठी सातत्याने लढा दिल्यामुळे किमान वेतनासह विविध लाभ मिळवून देण्यात यश आले आहे. वाढत्या महागाईच्या काळात कामगारांना सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी वेतनवाढ आवश्यक होती. ट्रस्टने सकारात्मक भूमिका घेत करारासाठी पुढाकार घेतल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

## केडगाव परिसरात रात्रीची पोलीस गस्त वाढवावी – सुरज कोतकर

**केडगावच्या अंबिकानगर परिसरात अज्ञातांकडून दारूच्या बाटल्यांची तोडफोड; नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण । घरांवर दारूच्या बाटल्या फेकून दहशत निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शहरातील केडगाव परिसरातील मनपा प्रभाग क्रमांक १६ मधील अंबिकानगर, दिघे वीटभट्टी परिसरात काही अज्ञात समाजकंटकांनी नागरिकांच्या घरांवर आणि कंपाऊंडमध्ये दारूच्या बाटल्या फेकून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याची गंभीर घटना घडली आहे. या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले असून संबंधितांवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे.

या संदर्भात राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष सुरज कोतकर यांच्या नेतृत्वाखाली कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांना निवेदन देण्यात आले. यावेळी कार्याध्यक्ष नितीन घोडके, प्रमोद शेजुळ, सुभाष लोळगे, राजेंद्र साबळे, चंद्रकांत पाटील, प्रज्योत देशमुख, सुजन क्षीरसागर यांच्यासह अंबिकानगर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, बुधवार दि. ३ जून २०२६ रोजी मध्यरात्री अंदाजे २ ते ३ वाजण्याच्या दरम्यान काही अज्ञात व्यक्तींनी अंबिकानगर परिसरातील घरांवर तसेच कंपाऊंडच्या आत दारूच्या बाटल्या फेकून त्यांची तोडफोड केली. या घटनेत काचेचे तुकडे घरांच्या आवारात तसेच परिसरात विखुरलेले आढळून आले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी या प्रकारामुळे नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

अंबिकानगर हा शहरातील अत्यंत शांत, सुसंस्कृत आणि निवासी भाग म्हणून ओळखला जातो. या भागात प्रामुख्याने सुशिक्षित, नोकरी–व्यवसाय करणारे, कुटुंबवत्सल नागरिक वास्तव्यास आहेत. अशा परिसरात मध्यरात्री घडलेली ही घटना अत्यंत गंभीर असून नागरिकांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.

या घटनेमुळे परिसरातील महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि कुटुंबीयांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. हा प्रकार केवळ मालमत्तेच्या नुकसानीपुरता मर्यादित नसून नागरिकांमध्ये दहशत आणि असुरक्षिततेची भावना निर्माण करणारा आहे. अशा समाजकंटक प्रवृत्तीच्या व्यक्तींवर वेळीच आळा घालणे आवश्यक असल्याचे नागरिकांनी निवेदनात नमूद केले आहे.

राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष सुरज कोतकर म्हणाले की, अंबिकानगर परिसरातील नागरिक कायदेशीर प्रक्रियेत अडकण्यापेक्षा सुरक्षित वातावरणात राहण्यास प्राधान्य देतात. मात्र नागरिकांच्या जीवित आणि मालमत्तेच्या सुरक्षेची जबाबदारी प्रशासनाची आहे. त्यामुळे या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन परिसरातील सर्व उपलब्ध सीसीटीव्ही फुटेजची तातडीने तपासणी करण्यात यावी.

संबंधित अज्ञात व्यक्तींचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कायदेशीर तसेच प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात यावी. अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## वृक्ष संवर्धनासाठी नागरिकांनी पुढे यावे : संरक्षण सहाय्यक हरिश दसरे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** पर्यावरणाचा दिवसेंदिवस ढासळत चाललेला समतोल व वाढते प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी शहरी भागात वृक्षारोपण व त्यांचे संवर्धन अत्यंत आवश्यक आहे. सरकारी यंत्रणा आपापल्या स्तरावर पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षरोपण अभियान राबवित असतात. मात्र नागरिकांनी देखील वृक्ष संवर्धनासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाचे सर्वेक्षण सहाय्यक हरिष दसरे यांनी केले.

०५ जून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जुन्या जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात नगर उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांचे हस्ते व श्री हरीष दसरे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये वृक्षारोपण करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

गेल्या काही वर्षांमध्ये शहरी भागातील तापमान ४० च्या पुढे चालले आहे. निसर्गाने दिलेली ही चेतावणी असून लागवडीसाठी योग्य अशा जागेमध्ये मोठ्या प्रमाणात भारतीय प्रजातीची सावली देणारी झाडे लावणे व त्यांचे संवर्धन करणे आवश्यक असल्याचे मत यावेळी



नगर भाग उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांनी व्यक्त केले. संवर्धन व देखभाल सुलभ व्हावे या दृष्टीने ८ ते १० फूट उंचीची करंज जातीची झाडे या परिसरात लावण्यात आली. या कार्यक्रमास अहमदनगर वस्तुसंग्रहालयाचे अभिरक्षक संतोष यादव, नारायण आव्हाड संदीप हापसे, योगेश पवार, हरीभुमी प्रतिष्ठानचे अभय ललवाणी, उल्हास नांगरे, रिजवान कादर शेख आदी उपस्थित होते.

# अहिल्यानगर लीग २०२५-२६ फुटबॉल स्पर्धेत फिरोदिया शिवाजियन्स विजयी

## सलग ८ सामने जिंकून खेळात वर्चस्व; सुमन फुटबॉल क्लब ठरले उपविजयी




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन (एडीएफए) आयोजित अहिल्यानगर लीग २०२५-२६ स्पर्धेचा शानदार समारोप चुरशीच्या अंतिम सामन्याने झाला. भुईकोट किल्ला मैदान येथे अंतिम सुपर लीग सामना फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल क्लब विरुध्द सुमन फुटबॉल क्लब यांच्यात झाला. अत्यंत रंगतदार झालेल्या या सामन्यात फिरोदिया शिवाजियन्स संघाने सुमन फुटबॉल क्लबवर वर ३-२ गोलने विजय मिळवत विजेतेपद पटकावले.

फिरोदिया शिवाजियन्स संघाने संपूर्ण स्पर्धेत शानदार कामगिरी करत सलग ८ सामने जिंकले तसेच लीग आणि सुपर लीगमध्ये पूर्ण गुण मिळवत अजिंक्यपद संपादन केले. फिरोदिया शिवाजियन्स कडून अभय साळवे याने १० व्या मिनिटाला पहिले गोल केले. त्यानंतर हिमांशू चव्हाण याने २६ व्या मिनिटाला पेनल्टीवर गोल करत आघाडी वाढवली. सुमन फुटबॉल क्लब कडून अविनाश शिंदे याने २९ व्या मिनिटाला पेनल्टीवर गोल करत फरक कमी केला. दुसऱ्या हाफमध्ये अभय साळवे याने ४५ व्या मिनिटाला पुन्हा गोल करत संघाची आघाडी मजबूत केली. अखेरीस अविनाश शिंदे याने ७० व्या मिनिटाला गोल करत सामना रंगतदार केला.

या लीग स्पर्धेत १२ संघांचा सहभाग होता. सुपर लीगमध्ये फिरोदिया शिवाजियन्स, सुमन फुटबॉल क्लब, बाटा फुटबॉल क्लब आणि गुलमोहर फुटबॉल क्लब या चार संघांनी प्रवेश केला. सुपर लीगमध्ये एकूण ६ सामने खेळविण्यात आले. अंतिम सुपर लीग क्रमवारीत प्रथम- फिरोदिया शिवाजियन्स, द्वितीय- सुमन एंटरप्रायझेस, तृतीय- बाटा फुटबॉल क्लब आणि चतुर्थ क्रमांकावर गुलमोहर फुटबॉल क्लब राहिले.

बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी महाराष्ट्र शासनाचे पुणे येथील औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभागाचे उपसंचालक स्वप्नील देशमुख हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. देशमुख म्हणाले की, अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन मागील ५४ वर्षापासून शहरात फुटबॉल खेळ रुजवून खेळाडू घडवित आहे. या गौरवास्पद कामगिरीने आज फुटबॉलचे उत्कृष्ट खेळाडू घडत आहे. खेळात विजय-पराभव महत्त्वाचा नसून खेळाडूवृत्ती महत्त्वाची असते. खेळातून नागरिकांमध्ये खेळाडूवृत्ती निर्माण होवून चांगले नागरिक घडत असल्याचे त्यांनी सांगितले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी मानद सचिव रोनाप फर्नांडिस, असोसिएशनचे ज्येष्ठ व आधारस्तंभ रिशपालसिंग परमार, संयुक्त सचिव व्हिक्टर जोसेफ, कार्यकारिणी सदस्य राजू पाटोळे, उपाध्यक्ष खालिद सय्यद, संयुक्त सचिव प्रदीप जाधव, खजिनदार तपन परमार आणि जेव्हिअर स्वामी यांचे विशेष योगदान लाभले. स्पर्धेच्या आयोजनासाठी अभय साळवे, अभिषेक सोनवणे आणि राजेश अँथनी यांनी विशेष परिश्रम घेतले. असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया आणि वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर यांनी सर्व सहभागी संघ, खेळाडू, पंच, आयोजक आणि फुटबॉलप्रेमी यांचे अभिनंदन केले. संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ट पंचगिरी केल्याबद्दल जिल्हा फुटबॉल असोसिएशन रेफरी पॅनेलचेही कौतुक करण्यात आले. पाहुण्यांचा परिचय प्रसाद पाटोळे यांनी करून दिला. आभार कार्यकारिणी सदस्या पल्लवी सैदाणे यांनी मानले.

# कॉकपिट टू कादंबरी! कॅप्टन नीलम यांच्या अष्टपैलू प्रवासाचा गौरव

## लोहार यूथ फाउंडेशनतर्फे मानपत्र देऊन विशेष सत्कार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर लोहार यूथ फाउंडेशन (एलवायएफ) वाचनकट्ट्याच्या वतीने एअर इंडियाच्या वैमानिक, लेखिका व मार्गदर्शक कॅप्टन नीलम इंगळे-लोबो, बोईंग-७७७ चे कमांडर कॅप्टन रॉबिन लोबो या दाम्पत्याला मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

एका कार्यक्रमानिमित्त कॅप्टन नीलम इंगळे लोबो व मुख्य वैमानिक रॉबिन लोगो हे अहिल्यानगरमध्ये आले होते, त्यावेळी हा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी उद्योजक विनायक गाडेकर, सावित्री हिवाळे आदी उपस्थित होते.



घरात विमानचालनाची कोणतीही पार्श्वभूमी नसताना, मूळच्या खर्डा (ता. जामखेड) व जन्म कडा (बीड) येथील असलेल्या नीलम यांनी वयाच्या २२ व्या वर्षी एअर इंडियामध्ये वैमानिक म्हणून प्रवेश मिळवला. आज त्या अत्याधुनिक एअरबस ए-३५० विमानावर लाईन ट्रेनिंग कॅप्टन म्हणून कार्यरत आहेत. कोविड काळात मिशन वंदे भारत अंतर्गत त्यांनी परदेशातील भारतीयांना सुरक्षित मायदेशी आणण्याचे कौतुकास्पद कार्य केले.

ढोर कादंबरीचे लेखक प्रा. भगवान इंगळे व प्रा. आशा इंगळे यांची कन्या असलेल्या कॅप्टन नीलम यांनी कॉकपिटमधील तांत्रिक अचूकतेसोबतच साहित्याची कोमलताही जपली आहे. त्यांचे नभांगण हे पुस्तक प्रकाशनाच्या वाटेवर आहे. जागतिक मराठी अकादमीच्या शोध मराठी मनाचा आणि नाशिकच्या वसंत व्याख्यानमालेत त्यांनी आपल्या व्याख्यानातून वेगळी छाप पाडली आहे.

नव्हती घराण्याला विमानचालनाची पार्श्वभूमी, तरी कष्टाने जिंकली आपण आकाशाची भूमी...‘‘ अशा शब्दांत मानपत्राद्वारे त्यांच्या बहुआयामी कर्तृत्वाचा आणि कौटुंबिक समतोलाचा गौरव करण्यात आला. विज्ञानाची दृष्टी आणि साहित्याची छाया जपणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व तरुण पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे एलवायएफ वाचनकट्टाचे विनायक गाडेकर यांनी सांगितले.

# प्रस्तावित मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायदा तात्काळ मागे घेण्यात यावा

## मागणीचे विश्व हिंदू परिषदेचे वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रस्तावित मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायद्यामुळे मंदिरांच्या आर्थिक स्रोतांवर गंभीर परिणाम होऊन अनेक धार्मिक आणि सामाजिक उपक्रम बंद पडण्याचा धोका निर्माण झाला आहे. हा कायदा हिंदू देवस्थानांच्या बाबतीतच हस्तक्षेप करणारा असून धार्मिक समतेच्या तत्त्वालाही बाधा पोहोचवणारा आहे. संविधानाने दिलेल्या धार्मिक स्वातंत्र्य आणि धार्मिक संस्थांच्या व्यवस्थापनाच्या अधिकारांवर हा कायदा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मर्यादा आणणारा आहे.



प्रस्तावित मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायदा तात्काळ व संपूर्णतः रद्द करण्यात यावा.या मागणीचे निवेदन अहिल्यानगर जिल्ह्यातील मंदिर,विश्वस्त, पुजारी यांच्या वतीने विश्व हिंदू परिषदेचे मंदिर एवंम अर्चक पुरोहित आयामाच्यावतीने निवासी जिल्हाधिकारी श्री.गिते यांना देण्यात आले आहे. याप्रसंगी विश्व हिंदू परिषद मंदिर एवंम पुरोहित आयामाचे विभाग टोळी सदस्य गजेंद्र सोनवणे, जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर,विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा परिषदेचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर, तुळजाभवानी माता देवीच्या पलंगाचे मानकरी गणेश पलंगे,श्री.राजापुरे, गोशाळेचे गौतम कराळे,अरुण खिची, दिनेश परदेशी,श्री.दुधाले आदी उपस्थित होते.

या निवेदनात असे नमुद केले आहे की,प्रस्तावित मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायदा तात्काळ रद्द करावा. तसेच, सनातन आणि प्रस्थापित हिंदू कायदा यांचे अनुषंगाने देवस्थान जमिनींवर झालेले अतिक्रमण तत् काळ काढून टाकून सदरील जमिनी देवस्थान कडे तत्काळ वर्ग करून एकंदरीतच देवस्थान जमिनीच्या संरक्षण,व्यवस्थापन आणि संवर्धनासाठी तज्ञ समिती नियुक्त करून व्यापक अभ्यासानंतर उपरोक्त उद्येश पूर्ती साठी कायद्याचे प्रारूप तयार करण्याची मागणी केली आहे.

राज्यातील सर्व प्रमुख देवस्थानांचे प्रतिनिधी, धर्माचार्य, कायदेतज्ञ, महसूल तज्ञ आणि सामाजिक संस्थांचा समावेश असलेली स्वतंत्र तज्ञ समिती नियुक्त करण्यात यावी.मंदिरांच्या धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक हितांचा सखोल अभ्यास करून नवीन प्रारूप तयार करण्यात यावे.कोणताही निर्णय घेण्यापूर्वी राज्यभरातील देवस्थान,अर्चक, पुजारी आणि हिंदू समाजाशी व्यापक चर्चा करण्यात यावी.

# केंद्र सरकारच्या एसटीईएम उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील दोन लाख विद्यार्थ्यांना मोफत रोबोटिक्स व कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण

## आयकॉनिक रोबोटिक्स इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून विकास कोटकर यांचा अभिनव पुढाकार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या वेगाने बदलणाऱ्या युगात विद्यार्थ्यांना आधुनिक कौशल्यांनी सक्षम करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारच्या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील तब्बल दोन लाख विद्यार्थ्यांना मोफत रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता (), इलेक्ट्रॉनिक्स आणि नवोपक्रमाचे प्रशिक्षण देण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आला आहे. आयकॉनिक रोबोटिक्स इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात येणार असून त्याचे नेतृत्व विकास कोटकर करीत आहेत.

या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञान न देता प्रत्यक्ष कृतीवर आधारित प्रशिक्षण दिले जाणार आहे. रोबोट्सची रचना, विविध सेन्सर्सचा वापर, प्रोग्रामिंगची मूलतत्त्वे, कृत्रिम बुद्धिमत्तेचे व्यवहार्य उपयोग तसेच दैनंदिन जीवनातील समस्यांवर तंत्रज्ञानाच्या सहाय्याने



उपाय शोधण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांना शिकविले जाणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्याबरोबरच सर्जनशीलता, संशोधनवृत्ती आणि समस्या सोडविण्याची क्षमता वाढीस लागणार आहे.

आजच्या स्पर्धात्मक आणि तंत्रज्ञानप्रधान युगात विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांसाठी तयार करणे ही काळाची गरज आहे. याच पार्श्वभूमीवर हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असून ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांमधील तांत्रिक ज्ञानाची दरी कमी करण्यासाठीही मदत करणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष ओळख विद्यार्थ्यांना शालेय स्तरावरच मिळाल्याने त्यांच्यात नवकल्पना विकसित करण्याची प्रेरणा निर्माण होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

याबाबत बोलताना विकास भारत कोटकर म्हणाले, ‘‘भविष्यातील तंत्रज्ञानाच्या जगासाठी विद्यार्थ्यांना सक्षम करणे, त्यांच्यामध्ये संशोधनाची आवड निर्माण करणे आणि नवकल्पनांना प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान पोहोचावे, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.‘‘

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यासोबतच त्यांना भविष्यातील करिअरच्या नव्या संधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. महाराष्ट्रातील जास्तीत जास्त शाळांनी आणि विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन विकास कोटकर यांनी केले आहे.

## निस्वार्थ सेवेची पावती!

# स्वीकृत नगरसेवक अबरार शेख अन् आदम भाई सय्यद यांचा शिर्डीत ज्येष्ठ मुस्लिम बांधवांकडून सत्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शिर्डी–** शिर्डी नगरपरिषद निवडणुकीत मिळालेल्या निर्भेळ यशानंतर, युवानेते डॉ. सुजय विखे पाटील यांनी घेतलेल्या एका सर्वसमावेशक आणि धाडसी निर्णयाची संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात मोठी चर्चा झाली होती. विखे पाटील परिवाराशी गेल्या अनेक वर्षांपासून एकनिष्ठ राहिलेले, अतिशय निस्वार्थपणे संघटनेसाठी कार्यरत असलेले आणि मुस्लिम समाजातील एका सर्वसामान्य कुटुंबातील सदा हसतमुख, मितभाषी कार्यकर्ते अबरार शेख यांची स्वीकृत नगरसेवक म्हणून झालेली निवड अनपेक्षित पण योग्य मानली गेली. याच निस्वार्थ सेवेची पावती म्हणून आज शिर्डीतील मुस्लिम समाज बांधवांच्या वतीने अबरार शेख आणि त्यांचे सहकारी आदम भाई सय्यद यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन जाहीर सत्कार करण्यात आला.

अबरार शेख यांनी नगरसेवक पदाची धुरा हाती घेतल्यापासून आपले सहकारी आणि डॉ. सुजय विखे पाटील यांचे खंदे समर्थक आदम भाई सय्यद यांच्या समवेत केवळ मुस्लिम समाज बांधवांच्याच नव्हे, तर सर्वच समाजाच्या समस्या सोडवण्यासाठी नेहमीच पुढाकार घेतला आहे. कामालाच देव मानून सर्वसामान्यांचे विविध प्रश्न मार्गी लावण्याचे काम अबरार शेख आणि आदम भाई सय्यद या दोन सहकाऱ्यांनी आजवर अगदी निस्वार्थपणे केले आहे.

या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या सत्कार समारंभाप्रसंगी मुस्लिम समाजाच्या ज्येष्ठ बांधवांनी या दोघांच्या सामाजिक कार्याचे भरभरून कौतुक केले आणि या दोघांना नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात यावा अशी इच्छा व्यक्त केली तसेच सर्वांनी त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याच कार्यक्रमादरम्यान राज्याचे जलसंपदामंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या आगामी वाढदिवसानिमित्त एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. वाढदिवसाच्या निमित्ताने कोणताही अनावश्यक खर्च किंवा बडेजाव न करता, विविध सामाजिक उपक्रम राबवून मुस्लिम समाजाच्या वतीने हा वाढदिवस साजरा करण्याचा मानस यावेळी सर्वानुमते व्यक्त करण्यात आला. या उपक्रमांतर्गत शिर्डी परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करणे, तसेच गरजू व गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करणे अशा समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन मुस्लिम समाज बांधवांच्या वतीने केले जाणार असल्याची माहिती यावेळी समाज प्रमुखांनी दिली. या निर्णयाचेही सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

(पान १ वरून)

## ‘त्यांना’ मुस्लिम सूचक चालतो कसा?; एमआयएम राष्ट्रवादीची बी टीम

जात नाही. मग अर्ज माघारीची मुदत दुपारी तीन वाजता संपल्यानंतर रात्री उशिरापर्यंत जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे कार्यालय सुरू कसे राहिले? निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता संपुष्टात आली असून जनतेचा यंत्रणेवरील विश्वास उडाला आहे झाल.

## चारचाकी चोरी झाल्याचे भासवून विमा क्लेम लाटण्याचा कट उघड

साथीदार सलमान मेहबूब खान (वय २१, रा. कोठला, अहिल्यानगर) याच्या मदतीने इन्शुरन्स क्लेम लाटण्याच्या हेतूने या स्कॉर्पिओची चोरी भासवली असल्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेला ५ लाख रुपये किमतीचा छोटा हत्ती टेम्पो आणि ५ लाख रुपये किमतीची स्कॉर्पिओ असा एकूण १० लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. ताब्यातील तिन्ही आरोपींना मुद्देमालासह तोफखाना पोलीस ठाण्याच्या स्वाधीन करण्यात आले असून, त्यांना अटक करण्यात आली आहे.

## जिल्ह्यात भाजपची सह महायुतीची ताकद पुन्हा अधोरेखित

चर्चा रंगली. उमेदवारी अर्ज माघारीच्या अंतिम टप्प्यात दत्तात्रेय पानसरे यांनी अर्ज बळजबरीने किंवा खोट्या सहीने मागे घेतल्याचा आरोप केल्याने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र त्यानंतर आमदार संग्राम जगताप आणि दत्तात्रेय पानसरे यांच्यात बंद दाराआड सविस्तर चर्चा झाली. चर्चेनंतर दोघेही एकाच वाहनातून बाहेर पडल्याने राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले. अखेर पानसरे यांची समजूत काढण्यात यश आले आणि त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातून बाहेर पडत माघारीची भूमिका कायम ठेवली. त्यामुळे प्राजक्त तनपुरे यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला. या संपूर्ण प्रक्रियेत डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांनी घेतलेल्या पुढाकारामुळेच शेवटच्या क्षणी निर्माण झालेला पेच सुटल्याची चर्चा सुरू असून, राजकीय वर्तुळात या जोडीची तुलना ‘‘जय-वीरू‘‘ जोडीशी केली जात आहे.

डॉ. सुजय विखे पाटील यांच्या भूमिकेची चर्चा

या बिनविरोध विजयामागे गेल्या चार दिवसांपासून डॉ. सुजय विखे पाटील यांनी घेतलेले प्रयत्न महत्त्वाचे ठरल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाचा उमेदवार बिनविरोध निवडून आणण्यासाठी पक्षाने दिलेली जबाबदारी त्यांनी प्रभावीपणे पार पाडल्याचे मानले जात आहे.यापूर्वी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरही प्राजक्त तनपुरे यांना निवडणूक लढविण्यापासून परावृत्त करत अक्षय कर्डिले यांचा मार्ग मोकळा करण्यात डॉ. सुजय विखे पाटील यांची भूमिका महत्त्वाची ठरल्याची चर्चा झाली होती. त्यानंतर आता विधानपरिषद निवडणूक बिनविरोध घडवून आणण्यातही त्यांचे योगदान निर्णायक ठरल्याचे बोलले जात आहे.

भाजपच्या संघटनशक्तीचे प्रदर्शन

अहिल्यानगर महानगरपालिका आणि जिल्ह्याच्या राजकारणात भाजपची वाढती संघटनात्मक ताकद या निकालातून पुन्हा एकदा स्पष्ट झाली आहे. सर्वपक्षीय समन्वय, संवादकौशल्य आणि संघटन व्यवस्थापनाचेही दर्शन घडविल्याची प्रतिक्रिया राजकीय जाणकारांकडून व्यक्त होत आहे. या घडामोडींमुळे अहिल्यानगर जिल्ह्यात भाजपचे राजकीय वर्चस्व आणखी बळकट झाल्याची चर्चा सुरू असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या विजयाकडे महत्त्वपूर्ण राजकीय संदेश म्हणून पाहिले जात आहे.

## ऊसतोड मजुरांची प्रामाणिक सेवा करणे हीच मुंडे साहेबांना खरी आठवण आणि श्रद्धांजली ठरेल – डॉ. ज्ञानेश्वर दराडे

कष्टकऱ्यांचे नेते होते. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे चालवणे हे आपले कर्तव्य आहे. ऊसतोड मजुरांचे प्रश्न सोडवणे आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी फाउंडेशन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाला स्थानिक नागरिक, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने मजूर बांधव उपस्थित होते.

लोकनेते गोपिनाथ मुंढे यांच्या स्मुती दिनानिमित्त आरोग्य शिबीर शिबिरात पाथर्डी येथील आरोग्यदीप मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक, हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अभिजीत पवार यांनी विशेष मार्गदर्शन केले. एकूण ११३ रुग्णांची तपासणी करून गरजूंना मोफत औषधे देण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुंडे साहेबांच्या प्रतिमेचे पूजन करून उपस्थितांनी अभिवादन केले. सालसिद्ध बाबा संस्थान, मिडसांगवीचे मठाधिपती महंत हनुमंत महाराज शास्त्री यांनी यथोचित आशीर्वचन दिले.

जेष्ठ ऊसतोडणी कामगारांनी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक , पाथर्डीचे भुमिपुत्र संघर्षयोद्धा माजी केंद्रीय मंत्री कै. बबनराव ढाकणे साहेब आणि लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेब यांच्या समाजोपयोगी कार्यांच्या आठवणी सांगताना उपस्थितांना वेगळीच ऊर्जा आणि प्रेरणा देणारी ठरली.

याप्रसंगी देवनाथ फाऊंडेशनचे प्रमुख डॉ. ज्ञानेश्वर दराडे यांनी ऊसतोडणी कामगारांच्या आरोग्य प्रश्नासाठी कृतीशील लढा सुरू असल्याचे सांगितले. ‘‘महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, पर्यावरण मंत्री लोकनेत्या पंकजाताई मुंडे आणि आ. प्रतापकाका ढाकणे यांच्या नेतृत्वातून याला लवकरच यश मिळेल. ऊसतोडणी कामगारांची सेवा हीच गोपीनाथ मुंडे साहेबांना खरी श्रद्धांजली ठरेल,’’ असे ते म्हणाले. यावेळी अनेकांच्या डोळ्यात अश्रू तरळले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सरपंच विजय राठोड, प्रा. दिलीप राठोड, साहेबराव राठोड, बाळासाहेब राऊत, अशोक खेडकर, मयूर काळुसे, महादेव जगताप, जयभगवान युवा प्रतिष्ठाण अध्यक्ष अनिल जवरे, रमेशपाटील अंदुरे, महादेव बटुळे, मुकादम संघटनेचे पोपट जवरे, भास्कर राठोड यांनी विशेष परिश्रम घेतले. न्यू तारकेश्वर मेडिकलचे संचालक कपिल बांगर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले तर डॉ. सौ. विद्या दराडे यांनी आभार मानले.

## देर्डे फाटा येथील साई जनार्दन हॉटेल तोडफोड प्रकरण; तीन दिवस उलटूनही गुन्हा दाखल नसल्याने चर्चांना उधाण

पुढे काय कारवाई होणार याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.घटनेमागील सत्य काय, मारहाण आणि तोडफोड कोणी व कोणत्या कारणातून केली, तसेच याप्रकरणी पोलीस प्रशासनाची भूमिका काय राहणार याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. पोलीस तपासानंतरच या प्रकरणाचे वास्तव समोर येणार असून अधिकृत माहितीची प्रतीक्षा आहे.